## निशाणी क्र. १७ खालील आदेश
## (दिनांक ३ ऑगस्ट २०१७)

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १, नियम १० नुसार त्यांना दाव्यात पक्षकार करावे यासाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनानुसार प्रस्तुतचा दावा गट क्र. ८३७/१ च्या मालकीबाबत दाखल केला आहे. परंतू मयत उत्तम रतनचंद भटेवरा यांनी दिनांक ०५.०५.१९९२ रोजी दावा मिळकतीमधिल ४० आर व ८० आर असे क्षेत्र अर्जदारांना दस्ताने ताब्यात दिले. सबब अर्जदारांच्या दावा मिळकतीमध्ये ताबा असतानाही वादातील खरेदीखत अस्तित्वात आल्यामुळे अर्जदारांना दाव्यामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

२ वादीने निशाणी क्र. २२कडे म्हणणे देवून सर्व कथनांचा इन्कार केला. वादीच्या कथनानुसार अर्जदाराने बनावट कागदपत्रांच्या आधारे वादीला हरकत अडथळा केला. अर्जदारांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. अर्जदारातर्फे श्री नगरकर वकिलांनी तर वादीतर्फे श्री एन.डी. मगर वकिलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच वादीने निशाणी क्र. २५कडे दिलेल्या लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले. वादीने दावा मनाई हुकूमासाठी तसेच दावा मिळकत मालकी हक्काने वहिवाटीस असल्याचे ठरवून मिळणेसाठी केला आहे. अर्जदाराच्या कथनानुसार मयत उत्तमचंद भटेवरा यांनी दावा मिळकत अर्जदाराच्या ताब्यात दिली होती. अर्जदारांनी निशाणी क्र.२१सोबत दिनांक ०५.०५.१९९२ रोजीचा नोटरी दस्त दाखल केला आहे. तसेच प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्र पाहता दिनांक ०८.०६.२०१५ रोजी मुद्रांक विक्री करण्यात आला व प्रतिज्ञापत्र दिनांक १७.०५.२०१५ रोजी करण्यात आले. दावा मिळकत अर्जदारांच्या कब्जेवहिवाटीस आहे यााबाबत सातबारापत्रकी नोंद नाही. अशा परिस्थितीत प्रथमदर्शनी अर्जदारांचा दावा मिळकतीशी संबंध असल्याचे दिसून येत

नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र असून मी पुढील आदेश देतो.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(सुमित वि. जोशी)
सह दिवाणी न्यायाधीश
कनिष्ठ स्तर, दौंड, जि. पुणे

दौंड.
दिनांक:— ०३.०८.२०१७

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Smt.S.V. Hirve |
| Court Name | : S.V. Joshi |
| | : Jt. Civil Judge J.D., Daund. |
| Date of Judgment | : 03.08.2017 |
| Judg. signed by P. O. | : 03.08.2017 |
| Uploaded on | : 03.08.2017 |